**राज्य माहिती आयोगाकडून पारित होणारे निर्णय, निर्देश, इत्यादीचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२१९/०८/६ (मा.अ.)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १० जून, २००८

## परिपत्रक

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(३) मध्ये नमूद केलेल्या बाबींसदर्भात चौकशी करण्यासाठी राज्य माहिती आयोगास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये दाव्याची न्यायचौकशी करतांना, दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत, तेच अधिकार असतील असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच कलम १९ (७) अन्वये तक्रारी व द्वितीय अपीलासंदर्भातील आयोगाचा निर्णय बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे आयोगाने सार्वजनिक प्राधिकरणांना दिलेले निर्देश, तक्रारी व द्वितीय अपिलांवरील निर्णय इत्यादीचे अनुपालन विहित कालावधीत करणे आवश्यक आहे. मात्र काही सार्वजनिक प्राधिकरणांकडून आयोगास योग्य प्रतिसाद दिला जात नसल्याचे निदर्शनास आले आहे.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता सर्व मंत्रालयीन विभागांनी तसेच सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व राज्य जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना सूचित करण्यात येते की, आयोगाने सार्वजनिक प्राधिकरणांना दिलेले निर्देश, तक्रारी व द्वितीय अपिलांवरील निर्णय इत्यादीचे योग्य रीतीने अनुपालन विहित कालावधीत करून आयोगाच्या निदेशांप्रमाणे त्याचा अनुपालन अहवाल आयोगाने विहित केलेल्या कालावधीत आयोगास कटाक्षाने सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी. याबाबत कर्तव्यच्युती करणाऱ्यांविरुद्ध संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने तातडीने उचित विभागीय कार्यवाही करावी.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर संगणक संकेतांक क्र. २००८०६१०१४५०००००१ वर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

स्वाक्षरी/-
(प्र. मा. माळवदकर)
शासनाचे उपसचिव